# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

**चंद्रपूर प्रदूषण निर्मुलन कृती आराखडा**

**मा.मंत्री, पर्यावरण यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हयातील मा.खासदार, मा.आमदार व शासकीय अधिकारी यांच्यासमवेत दि.१४.१०.२०११ रोजी दुपारी १२.०० वा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर येथे झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताचा मसुदा**

चंद्रपूर जिल्हयातील प्रदूषणाची सद्यस्थिती, चंद्रपूर कृती आराखडा व अंमलबजावणीबाबत मा.मंत्री, पर्यावरण, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली चंद्रपूर जिल्हयातील मा.खासदार, मा.विधान परिषद सदस्य, मा.विधान सभा सदस्य व इतर संबंधित शासकीय अधिकारी यांची बैठक दि.१४.१०.२०११ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर येथे घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये म.प्र.नि.मंडळाचे सदस्य सचिव, जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधिक्षक व इतर शासकीय अधिकारी उपस्थित होते.

म.प्र.नि.मंडळातर्फे श्री.वि.मो.मोटघरे, सह संचालक (हप्रनि) यांनी कृती आराखडयाचे सादरीकरण करुन प्रदूषण नियंत्रणासाठी करावयाच्या उपाययोजनेबाबत विस्तृत माहिती सादर केली.

मा.मंत्री, पर्यावरण यांनी चंद्रपूर जिल्हयातील कारखान्यांमुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे. तसेच प्रदूषण कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनेबाबत सुध्दा आराखडा तयार केलेला आहे, असे नमूद केले. तसेच मंडळाने विविध उद्योगांच्या विविध सेक्टरच्या बैठका घेऊन प्रदूषण नियंत्रणाकरीता करावयाच्या उपाययोजनेबाबत निदेश दिले. मा.मंत्री महोदयांनी सदर बैठकीच्या आयोजनाचा उद्देश सर्व लोकप्रतिनिधींच्या भावना समजावुन घेणे, तसेच विविध विभागाचे व अशासकीय संस्थांचे मत जाणुन व अंमलबजावणीबाबतचे धोरण स्पष्ट केले.

मा.श्रीमती शोभाताई फडणवीस, विधान परिषद सदस्य यांनी नमूद केले की, यापुढे चंद्रपूर जिल्हयातील प्रदूषणाचे सादरीकरण मराठीत करण्यात यावे. तसेच बल्लारपूर पेपर मिल यांनी प्रदूषण नियंत्रणेत येण्याकरीता धारण करण्याबाबत सुचना दिल्या. मे.बल्लारपूर पेपर मिल ने टेकडीवर केलेल्या वृक्षलागवडीबाबत कृषि विभागातर्फे पडताळणी करण्याच्या सुचना केलेल्या आहेत.

मा.श्री.सुभाष धोटे, विधान सभा सदस्य, राजुरा यांनी ट्रकव्दारे वाहतुकीच्या दरम्यान ओव्हर लोडींग, तसेच कोल डेपोवर व प्रदुषणकारी सिमेंट कारखान्यांवर कारवाईबाबत सुचना केल्या.

..२..

28

मा.श्री.सुधीर मुनगंटीवार, विधान सभा सदस्य, बल्लारपूर यांनी कृती आराखडयातील कालबध्द कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी ठोस कारवाईबाबत नमूद केले. तसेच कारखान्याने / नगरपालिकेने उघडया असलेल्या जागेत वृक्ष लागवड करण्याबाबत सुचना दिल्या. मे.वेस्टर्न कोल फिल्ड तर्फे टाकण्यात येणाऱ्या ओव्हर बर्डन मातीच्या ढिगाऱ्यांचे योग्यरित्या नियमाप्रमाणे विल्हेवाट लावावी असे सुचविले. भविष्यात अशाप्रकारची बैठक तीन महिन्यांतून एक बैठक घेण्याबाबत सुचना केली.

मा.श्री.नानाजी शामकुळे, विधान सभा सदस्य, चंद्रपूर यांनी प्रदुषण नियंत्रणाबाबत ठोस उपाययोजनांबाबत उद्योगांकडून कालबध्द कार्यक्रम करण्याबाबत सुचना केली. तसेच कारखान्याव्दारे प्रदूषण नियंत्रण यंत्रणा सतत चालु ठेवण्याबाबत कारखान्याने वेगळे विजेचे मीटर लावून त्याची माहिती देण्याबाबत सुचना दिली.

मा.श्री.हंसराज अहिर, लोकसभा सदस्य, यांनी चंद्रपूर जिल्हयातील कृती आराखडयामध्ये चंद्रपूर, गडचांदूर, दुर्गापूर ही गांवे अंतर्भूत करण्याबाबत सांगितले. तसेच कृती आराखडयात चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्र, मे.वेस्टर्न कोल फिल्ड, महाराष्ट्र इलेक्ट्रॉस्मेल्ट, इ. उद्योगांचा समावेश करण्याबाबत सुचना केल्या. त्यांनी सुचविले आहे की, मे.वेस्टर्न कोलफिल्डच्या प्रदुषणामुळे व तसेच वाहतुकीमुळे होणाऱ्या प्रदुषणामुळे सर्व कोलवॉशरीज चंद्रपूर येथील औष्णिक विद्युत केंद्राकडे स्थानांतरीत करण्यात यावे व नविन येणारे प्रदुषणकारी उद्योग चंद्रपूर पासून ५० कि.मी. अंतरावर स्थापित करण्यात यावे, असे नमूद केले. खनिजांची रस्त्यावरील ओव्हर लोडींग यावर होणारी वाहतूक कमी करण्याकरीता खनिजांची वाहतूक कन्व्हेअर बेल्टच्या साहाय्याने करण्यात यावे, याबाबत सुचना केली. तसेच चंद्रपूर शहरात प्रदूषण जास्त असल्यामुळे जिल्हा लोड शेडींग मुक्त करावा व २४ तास वीज चालु ठेवावी, अशी सुचना केली.

मा.श्री.अतुल देशकर, विधान सभा सदस्य, ब्रम्हपुरी यांनी राईस मिलमुळे होणाऱ्या प्रदुषणाचा प्रश्न उपस्थित केला. राईस मिल मधील कोंडा साठविण्यासाठी बंदिस्त शेडची व्यवस्था केली पाहिजे. तसेच कोंडयाची वाहतूक करतांना ट्रक पूर्णतः ताडपत्रीने आच्छादलेला असावा व ब्रम्हपुरी येथील कत्तलखान्याची व्यवस्था करण्याबाबत सुचना केली.

श्री.सुरेश चोपणे, अध्यक्ष, ग्रीन प्लॅनेट सोसायटी, चंद्रपूर, श्री.बंडू धोत्रे, अध्यक्ष, इको प्रो., चंद्रपूर, श्री.दूधपचारे, चंद्रपूर, श्री.कुन्नुर, ग्रीन ग्लोब सोसायटी, चंद्रपूर या अशासकीय संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना आपले मत प्रदर्शित करुन कृती आराखडयाच्या अंमलबजावणीबाबत लक्ष वेधले. तसेच आरोग्य विषयक अभ्यास, रस्त्यालगत वृक्षलागवड व अंमलबजावणीसाठी समिती स्थापन करण्याबाबत सुचना देण्यात आल्या. ..३..

जिल्हा पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांनी पोलीस विभागातर्फे ओव्हर लोडींग बाबत करण्यात आलेल्या कारवाईबाबत माहिती देऊन सांगितले की, आतापर्यंत अशा ओव्हर लोडींग जवळपास ६०० ट्रकवर कारवाई करण्यात येऊन दंड आकारण्यात आलेला आहे व त्यामुळे ट्रक वाहतुकीच्या ओव्हर लोडींगवर बराच आळा घातलेला आहे. प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी सांगितले की, ज्या ट्रकवर अतिरिक्त भार वाहून नेण्याबाबत २-३ पेक्षा जास्त वेळा कारवाई झाली असेल याबाबत शासनस्तरावर निर्णयासाठी पाठपुरावा करण्यात यावा. इंधनामध्ये होणाऱ्या भेसळीबाबत येणाऱ्या अडचणींबाबत सुध्दा नमूद केले.

जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी कोल डेपोवर कायदेशीर कारवाइ करण्याबाबत व कारवाइ केलेल्यांबाबत पुढील सात दिवसांत अंतिम निर्णय घेण्यात येईल असे नमूद केले. फ्लाय ॲश बाबत मे.वेस्टर्न कोलफिल्ड व सीटीपीएस यांच्यामध्ये करार झालेला असून काही प्रमाणात राख वापरण्यात येणार असल्याचे नमूद केले. तसेच आराखडयाबाबत जिल्हास्तरावर वेळोवेळी आढावा बैठक घेऊन त्याचे नियोजन व अंमलबजावणी करण्यात येत आहे.

श्री.मिलिंद म्हैसकर (भाप्रसे), सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी नमूद केले की, सन २००९ मध्ये केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने जारी केलेल्याअहवालामध्ये प्रदुषणकारी क्षेत्र ठरविण्यात आले असून चंद्रपूर जिल्हयातील ४ क्षेत्रांकरीता केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या Terms & reference कृती आराखडयाप्रमाणे करण्यात आले असून त्याची अंमलबजावणी सुरु आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ ही एक रेग्युलेटरी बॉडी असून याव्दारे प्रदूषण नियंत्रण कायदे राबविले जातात. सदर कायदयामध्ये दंड आकारण्याची तरतुद नाही. उल्लंघन करणाऱ्या उदयोगावर कायदयान्वये फौजदारी कारवाई करण्याची तरतूद आहे. परंतू या कारवाईमध्ये बराच कालावधी जातो. त्यामुळे कायदयातील तरतुदीप्रमाणे उदयोगांना प्रदूषण नियंत्रणाकरीता योग्य ते निर्देश देण्यात येतात व त्यांचे पालन होण्यासाठी बँक हमी घेण्यात येते व निर्देशाचे पालन न झाल्यास ती जप्त करण्यात येते. निर्देशाचे कडक पालन होण्याकरीता जुजबी बँक हमी न घेता प्रदूषण नियंत्रण सुधार व्यवस्थेसाठी लागणाऱ्या एकूण रकमेच्या दहा टक्के बँक हमी घेण्याचे धोरण मंडळाने नुकतेच स्विकारले आहे व प्रदूषणकारी उदयोगावर कडक कारवाई करण्यात येईल.

मंडळाचे अखत्यारीमध्ये लोडशेडींग इ. सारखे विषय येत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थामधून निर्माण होणारे सांडपाणी विनाप्रक्रिया नदयांमध्ये विसर्जित होत असल्याने नदयांचे पाणी प्रदुषित होत आहे. नद्यांच्या प्रदूषणामध्ये ८० टक्के सहभाग हा स्थानिक स्वराज्य संस्थामधून निर्माण होणाऱ्या सांडपाण्याचा आहे. प्रदूषण नियंत्रणाकरीता जनजागृतीची गरज असून ती मोहीम घेण्यात येईल व त्याचप्रमाणे कृती आराखडयाच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक संबंधित खात्याने सहकार्य करुन कृती आराखडा यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश दिले.

..४..

मा.श्री.संजय देवतळे, मंत्री, पर्यावरण यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात उद्योगांना अशा सुचना दिल्या की,

१. खनिज विकास निधीचा विकास करुन चंद्रपूर शहरासाठी बायपास रोड बांधण्याबाबत उपाययोजनाची पडताळणी करावी.

२. औष्णिक विद्युत केंद्राने प्रदुषणाबाबत, तसेच राखेच्या विल्हेवाटीबाबत तात्काळ उपाययोजना करावी.

३. वे.को.लि.ने ओव्हर बर्डनच्या विल्हेवाटीबाबत शास्त्रीय पध्दतीने उपाययोजना करावी.

४. प्रदूषण कमी करण्यासाठी सदर कृती आराखडयाची प्रभावशाली अंमलबजावणीकरीता सर्व लोकप्रतिनिधी, अशासकीय संस्था व इतर विभागांचे मते जाणून घेउन समन्वयाने पुढे वाटचाल करण्याचा उददेश ठेवून बैठकीचे आयोजन करण्यात आले.

५. चंद्रपूर कृती आराखडयाबाबत प्रत्येक विभागाने यशस्वीरित्या अंमलबजावणी करावी.

६. उदयोग जर रात्री प्रदूषण नियंत्रण व्यवस्था चालवित नसतील तर वेगळे इलेक्ट्रीक मीटर लावून तपासणी करावी, त्याबाबत संबंधितांना सुचना देण्याचे आदेश दिले.

७. ओव्हर लोडींग नियंत्रणाकरीता बंदिस्त ट्रकची कल्पना असून सद्यस्थितीत कोणत्याही ट्रक बनविण्याचा कंपन्यांकडे ट्रक उपलब्ध नाही. तथापी ,याबाबत सर्व उदयोगांची कार्यशाळा घेउन त्यांना बंदिस्त ट्रकचे मॉडेल दाखवुन चर्चा करण्यात आली व त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी दि.०१.०४.२०१२ पासून करण्यात येईल.

८. सर्व उदयोगांना वृक्ष लागवड तसेच त्याची जोपासना करण्याबाबत सुचना करण्यात येईल.

९. पर्यावरणाच्या जनजागृतीसाठी प्रयत्न करण्यात येतील व कार्यशाळा घेण्यात येतील.

१०. लोकप्रतिनिधींच्या भावना समजून घेउन कृती आराखडयामध्ये योग्य अंतर्भाव करून सर्वांचे सहकार्याने कृती आराखडा राबविण्यात येईल.

यानंतर मा. मंत्री महोदयांनी बैठकीस उपस्थित असलेल्या सर्वांचे आभार मानुन बैठक संपल्याचे जाहीर केले.

--------

## उपस्थितांची यादी

१. मा. श्री. संजय देवतळे, मंत्री, पर्यावरण व सांस्कृतीक कार्य, महाराष्ट्र शासन.
२. मा. श्री. हंसराज अहीर, खासदार, चंद्रपूर.
३. मा. श्री. मारोतराव कोवासे, खासदार, गडचिरोली.
४. मा. श्री. नानाजी शामकुळे, आमदार, चंद्रपूर.
५. मा. श्री. सुधीर मुनगंटीवार, आमदार, बल्लारपूर.
६. मा. श्री. अतुल देशकर, आमदार, ब्रम्हपूरी.
७. मा. श्रीमती शोभाताई फडणवीस, आमदार, मुल.
८. मा. श्री. सुभाष धोटे, आमदार, राजुरा.
९. मा. श्री. मिलिंद म्हैसकर, सदस्य सचिव, म.प्र.नि. मंडळ, मुंबई.
१०. मा. श्री. विजय वाघमारे, जिल्हाधिकारी, चंद्रपूर.
११. मा. श्री. सुवेझ हक, पोलीस अधिक्षक, चंद्रपूर.
१२. मा. श्री. व्ही. एम. मोटघरे, सहसंचालक (ह.प्र.नि.) म.प्र.नि. मंडळ, मुंबई.
१३. श्री. निहूल, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर.
१४. श्री. विवेक मिश्रा, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चंद्रपूर.
१५. श्री. अ. मा. अबांदेकर, अधिक्षक अभियंता पाटबंधारे विभाग, चंद्रपूर.
१६. श्री. अशोक कुरील, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, चंद्रपूर.
१७. श्री. डॉ. प्रमोद सोनुने, सिव्हील सर्जन, सामान्य रूग्णालय चंद्रपूर.
१८. श्री. डॉ. आनंद कांबळे, जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. चंद्रपूर.
१९. श्री. प्रकाश गुंडावार, प्रादेशिक परिवहन अधिकारी, चंद्रपूर.
२०. श्री. गणेश गोखले, अधिक्षक अभियंता महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, चंद्रपूर.
२१. श्री. के. के. सिन्हा, राजीव गांधी कॉलेज ऑफ इंजि. रिसर्च अॅन्ड टेक्नॉलॉजी, चंद्रपूर.
२२. श्री. हे. दी. कुलकर्णी, उप अभियंता, म.औ.वि.म. नागपूर.
२३. श्री. सुरेश चोपणे, अध्यक्ष, ग्रीन प्लॅनेट सोसायटी.
२४. श्री. बंडु धोतरे अध्यक्ष, इको. प्रो. चंद्रपूर.
२५. डॉ. योगेश दुधपचारे, कोषाध्यक्ष, ग्रीन प्लॅनेट सोसायटी.
२६. प्रा. सचिन वझलवार, ग्रीन प्लॅनेट सोसायटी.
२७. श्री. जोसेफ, सॅनिटर इन्सपेक्टर, नगर परिषद, चंद्रपूर.
२८. श्री. अनिल घुमडे, क.अ.न.प. चंद्रपूर.
२९. श्री. चरणदास शेडमाके, कार्यालय अधिक्षक, चंद्रपूर.
३०. श्री. बि. डी. मडावी, ट्राफिक पो. नि. चंद्रपूर.
३१. श्री. अतुल आदे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, चंद्रपूर.
३२. डॉ. पोद्दार अध्यक्ष ग्रीन ग्लोब सोसायटी, चंद्रपूर.
३३. श्री. कमल बानाईत, जिल्हा माहीती अधिकारी.
३४. श्री. श्रीनिवास कन्नुर, ग्रीन ग्लोब सोसायटी, चंद्रपूर.
३५. श्री. के. संपथ, ग्रीन ग्लोब सोसायटी, चंद्रपूर.
३६. श्री. सौदागर, आरोग्य निरीक्षक, नगर परिषद, बल्लारपूर.